नवराष्ट्र Pune | 04 February 2026 | Page 5

जबाबदार आरोग्यसेवा प्रदान करणे शक्य होते.

व्यावसायिकांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि जागतिक आरोग्यसेवा अनुभव मिळण्याची संधी प्राप्त होईल.

# जिज्ञासूवृत्तीने ज्ञानप्राप्ती करावी

## डॉ. अरविंद नातू; शाहू कॉलेजमध्ये टेक्नो–सोशल महोत्सव

**पिंपरी, प्रतिनिधी.** दैनंदिन जीवनातील प्रत्येक घटनेमागे विज्ञान दडलेले असून, ते समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती बाळगणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन कोलकाता येथील IISERच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ. अरविंद नातू यांनी केले.जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'इनोव्हिजन २०२६' या भव्य टेक्नो–सोशल महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. नातू बोलत होते.उद्घाटन समारंभास करिअर समुपदेशक डॉ. दीपक शिकारपूर, मॅग्ना इंटरनॅशनलचे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर,



टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ. पी. पी. विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ. सुधीर भिलारे, शाहू कॉलेजचे संचालक डॉ. अविनाश बडधे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. बडधे यांनी सांगितले की, 'इनोव्हिजन' हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य व ज्ञानविनिमयाचे प्रभावी व्यासपीठ आहे. यावर्षीची संकल्पना 'समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान' असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती व सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करण्यात आला आहे.डॉ. शिकारपूर यांनी २०२६ मध्ये एआय आणि नव्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधी वाढत असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्यांसोबत संवाद कौशल्ये आणि सॉफ्ट स्किल्सचा महत्त्व यावर भर देण्याचे मार्गदर्शन केले.या महोत्सवात सुमारे ४ हजार विद्यार्थ्यांनी सुमारे १ हजार प्रकल्प सादर केले आहेत, ज्यामुळे शैक्षणिक, सामाजिक व तांत्रिक नवकल्पनांचा संगम अनुभवता आला.

केसरी
पुणे, ३ फेब्रुवारी २०२६

# जिज्ञासू वृत्ती बाळगली पाहिजे : डॉ. नातू

**पिंपरी** : दैनंदिन जीवन जगताना प्रत्येक बाबींमध्ये विज्ञान दडलेले असते. मात्र आपण वैज्ञानिक दृष्ट्या ते जाणून घेतले पाहिजे.यासाठी आपण जिज्ञासू वृती बाळगली पाहिजेत. असे मत कोलकाता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ अरविंद नातू यांनी व्यक्त केले.



जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इनोव्हिजन २०२६ या भव्य टेक्नो-सोशल महोत्सवाचे उदघाटन प्रसंगी ते बोलत होते .

या प्रसंगी माहिती तंत्रज्ञान लेखक, करिअर समुपदेशक डॉ.दीपक शिकारपूर,मॅग्रा इंटरनॅशनल चे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर, टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, श्यामसुंदर मडेवार,युवा उद्योजक राजेश साबणे, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ पी.पी विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ सुधीर भिलारे, शेतकरी शैक्षणिक संस्थेचे संचालक रवी सावंत, शाहू कॉलेजचे संचालक डॉ अविनाश बडधे आदी उपस्थित होते.

डॉ बडधे म्हणाले कि,इनोव्हिजन हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखला जात असून, इनोव्हिजन २०२६ ही आवृत्ती अधिक व्यापक, समावेशक आणि भव्य स्वरूपाची ठरणार आहे.इनोव्हिजन २०२६ची यावर्षीची संकल्पना समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान अशी असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करते.

डॉ शिकारपूर म्हणाले कि,२०२६ सालामध्ये भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे आणि 'एआय' आता केवळ जुजबी वापर आणि प्रायोगिक पुरते राहिले नाही. भारतीय तंत्रज्ञांसाठी या वर्षीची सर्वात महत्त्वाची तंत्रज्ञाने आणि त्यासाठी करिअर नोकरीसाठीची तयारी हा विद्यार्थी व शिक्षकांपुढचा मुख्य प्रश्न असला पाहिजे . जागतिकीकरणामुळे केवळ तंत्रज्ञान माहीत असणे पुरेसे नाही, तर संवाद साधणेही महत्त्वाचे झाले आहे. भारतीय कंपन्या आता युरोप, जपान आणि दक्षिण कोरियासारख्या देशांमध्ये आपला व्यवसाय वाढवत आहेत. अशा वेळी जपानी, जर्मन, फ्रेंच किंवा मँडरीन (चिनी) भाषा येणाऱ्या तंत्रज्ञांना इतरांच्या तुलनेत ३० ते ४० टक्के जास्त पगार आणि परदेशात कामाची संधी मिळत आहे. एआय भाषांतर करत असले तरी, मानवी संबंध प्रस्थापित करण्यासाठी आणि व्यावसायिक करारांसाठी भाषेचे ज्ञान असणे हे एक मोठे कौशल्य मानले जात आहे.तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्य आणि वेळेचे नियोजन यांसारख्या सॉफ्ट स्किल्सना देखील खूप महत्त्व आहे कारण बहुतांश कंपन्या आता हायब्रीड मॉडेलवर काम करत आहेत. डॉ पैठणे म्हणाले की या महोत्सवामध्ये सुमारे ४ हजार विद्यार्थ्यांनी आपले विविध क्षेत्रातील प्रकल्प सादर केले आहेत. यामध्ये स्किल डेव्हलपमेंट, शोध निबंध, प्रकल्प प्रदर्शन, रोबोटिक्स, कॉंक्रीट क्यूब, इलेक्ट्रो सर्किट डिझाईन, कोडिंग अशा विविध प्रकल्पांचा या मध्ये समावेश आहे. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर मते यांनी तर स्वागत समन्वयक डॉ. अजय पैठणे केले. आभार डॉ. प्रवीण घटे यांनी मानले.सूत्रसंचालन अथर्व मुनोत, तेजस चौधरी, इशिता जाधव, ओमकार काळे यांनी केले.

LIBRARY TATHAWADE

अहिल्यानगर येथून दररोज

सकाळ

**पुणे,** बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

• आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.

# दैनंदिन जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा

## डॉ. अरविंद नातू; 'इनोव्हिजन २०२६' टेक्नो सोशल महोत्सवात मार्गदर्शन

**पिंपरी, ता. ३ :** 'दैनंदिन जीवन जगताना प्रत्येक बाबींमध्ये विज्ञान दडलेले असते. मात्र, आपण ते वैज्ञानिकदृष्ट्या जाणून घेतले पाहिजे. यासाठी आपण जिज्ञासू वृती बाळगली पाहिजे,'' असे मत कोलकता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ. अरविंद नातू यांनी व्यक्त केले.

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे 'इनोव्हिजन २०२६' या टेक्नो सोशल महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. करिअर समुपदेशक डॉ. दीपक शिकारपूर, मॅम्ना इंटरनॅशनलचे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर, टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, 'सकाळ'च्या यिनचे प्रमुख श्यामसुंदर माडेवार, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ. पी. पी. विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ. सुधीर भिलारे, शेतकरी शैक्षणिक संस्थेचे संचालक रवी सावंत, शाहू कॉलेजचे संचालक डॉ. अविनाश बडधे आदी उपस्थित होते.

डॉ. बडधे म्हणाले, ''इनोव्हिजन हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखला जातो. इनोव्हिजन २०२६ ही आवृत्ती अधिक व्यापक, समावेशक आणि भव्य स्वरूपाची ठरणार आहे. इनोव्हिजन २०२६ ची यावर्षीची संकल्पना समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान अशी असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करते.

डॉ. शिकारपूर म्हणाले, ''२०२६ मध्ये भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे, आणि 'एआय' आता केवळ जुजबी वापर आणि प्रायोगिक पुरते राहिले नाही. भारतीय तंत्रज्ञांसाठी या वर्षीची सर्वांत महत्त्वाची तंत्रज्ञाने आणि त्यासाठी करिअर नोकरीसाठीची तयारी हा विद्यार्थी व शिक्षकांपुढचा मुख्य प्रश्न असला पाहिजे. तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्य आणि वेळेचे नियोजन यांसारख्या सॉफ्ट स्किल्सना देखील खूप महत्त्व आहे. कारण बहुतांश कंपन्या आता हायब्रीड मॉडेलवर काम करत आहेत. डॉ. बडधे म्हणाले, ''ग्रामीण व दुर्गम भागातील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनाही समान संधी मिळावी, यासाठी प्रवेश सर्वांसाठी खुला ठेवण्यात आला.'' विविध कल्पना, स्पर्धात्मक वातावरण आणि देशभरातील उत्कृष्ट विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्याची संधी इनोव्हिजन २०२६ विद्यार्थ्यांना देणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

डॉ. पैठणे म्हणाले, ''या महोत्सवात सुमारे चार हजार विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रातील प्रकल्प सादर केले आहेत. स्किल डेव्हलपमेंट, शोध निबंध, प्रकल्प प्रदर्शन, रोबोटिक्स, काँक्रिट क्यूब, इलेक्ट्रो सर्किट डिझाईन, कोडिंग अशा विविध प्रकल्पांचा यामध्ये समावेश आहे. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर मते यांनी केले. सूत्रसंचालन अथर्व मुनोत, तेजस चौधरी, इशिता जाधव, ओमकार काळे यांनी केले. स्वागत डॉ. अजय पैठणे यांनी केले. आभार डॉ. प्रवीण घटे यांनी मानले.